<u>निशानी क्र.१३ खाली</u>

**फॉर्म क्रमांक–अ**

| | |
|---|---|
| **फिर्यादी/अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार मार्फत**<br>राज्य उत्पादन शुल्क किनवट बीट क्र.१ |
| **प्रतिनिधी/प्रतिनिधीत्व** | सहा.सरकारी अभियोक्ता<br>श्री. डी.ए. झाडे |
| **आरोपी/ बचाव पक्ष** | **०१. दिपक धर्माजी कयापाक,**<br>वय: ५१ वर्षे, व्यवसाय: धाबाचालक,<br>रा.अंबाडी, ता. किनवट, जि. नांदेड<br>**०२. गजानन राजु सुर्यवंशी,(गुन्हा कबुल)**<br>वय :२७ वर्षे, व्यवसाय: मजुरी<br>रा. पौर्णीमानगर, गोकुंदा ता. किनवट<br>**०३. बजरंग आत्माराम आडे (गुन्हा कबुल)**<br>वय :२९ वर्षे, व्यवसाय: मजुरी<br>रा. पौर्णीमानगर, गोकुंदा ता. किनवट |
| **प्रतिनिधी/प्रतिनिधीत्व** | आरोपी क्र.१ चे विधीज्ञ श्री.के.के. मुनेश्वर |

**फॉर्म क्रमांक–ब**

| | |
|---|---|
| **गुन्हयाचा दिनांक** | ११/०४/२०२५ |
| **प्रथम खबरेचा दिनांक** | ११/०४/२०२५ |
| **दोषारोप दाखल दिनांक** | २२/०४/२०२५ |

| | |
|---|---|
| प्रतिकथन निश्चितीचा दिनांक | १३/०६/२०२५ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | १४/०८/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १०/०४/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, लागु असेल तर | लागु नाही |

**फॉर्म क्रमांक–क**

| आरोपीचा अनुक्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोपीत गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा सिध्ददोषी | देण्यात आलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार वजावट होण्यासाठी आरोपीने कारावासात भोगलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | दिपक धर्माजी कयापाक, | निरंक | २२/०४/२०२५ | कलम ६८(अ)(ब) म. मद्य निषेध कायदा | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**फॉर्म क्र.ड**

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांच्या साक्षीदारांची यादी

अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | निशीकांत पंढरीनाथ भोकरे | फिर्यादी व नमुना वाहक |

ब. बचाव पक्ष साक्षीदार

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालयाचे साक्षीदार

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांनी निशांकित केलेली कागदपत्रे

अ. अभियोग पक्षाची कागदपत्रे

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १४ | फिर्याद |
| २ | १५ | प्रथम खबर अहवाल |
| ३ | १६ | नमुना प्रयोगशाळेला पाठविल्याचे पत्र |

ब. बचाव पक्षाने निशांकित केलेली कागदपत्रे

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. न्यायालय

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## ड. विशेष साहित्य (**Material Object**)

| अनुक्रमांक | वस्तुला दिलेले क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(निकाल तारीख १०/०४/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरूध्द महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा कलम ६८(अ)(ब) प्रमाणे दाखल करण्यात आलेला आहे.

०२. सरकार पक्षाची कथने व आरोपीचा बचाव पाहता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांचे निष्कर्ष त्यावरील कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ११/०४/२०२५ रोजी १९.३० वाजण्याच्या सुमारास मौजे घोटी, ता. किनवट जि. नांदेड येथील आर. के. धाबा येथे आरोपी दारुचा सार्वजनिक गुत्ता अवैधपणे चालवत असताना मिळून आल्याचे अभियोग पक्ष सिध्द करतो का ? | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र.१ करीताः–</u>**

**०३.** आरोपीवरील दोषारोप सिध्द होण्यासाठी आरोपी त्याच्या मालकीच्या अथवा ताब्यातील आर. के. ढाबा येथे लोकांना दारु पिण्यासाठीची व्यवस्था करुन दारुचा अवैध गुत्ता चालवित असताना मिळून आल्याचे निःसंशयितपणे सिध्द करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने अभियोग पक्षातर्फे निशीकांत (अ.सा.क्र.१) जो फिर्यादी व नमुना वाहक याची साक्ष नोंदविण्यात आली. त्याच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांना अशी गुप्त बातमी मिळाली की, आरोपी त्याच्या मालकीच्या आर. के. ढाबा येथे लोकांना दारु पिण्यासाठी अवैधपणे बसण्याची सोय करुन देत आहे. त्याप्रमाणे त्यांनी आर. के. ढाबा येथे छापा टाकला असता, आरोपी क्रं. २ व ३ तेथे विदेशी दारु पित असताना त्यांना मिळून आले.

**०४.** पुढे त्याच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी घटनास्थळावरील विदेशी दारुच्या बॉटल, खुरच्या, काचेचे ग्लास व मग इत्यादी वस्तू जप्त केल्या. त्यानंतर आरोपी क्रं. २ व ३ यांची वैद्यकीय तपासणी करुन घेतली. त्यानंतर त्याने स्वतः घटनेची फिर्याद दिली. दिनांक १५.०४.२०२५ रोजी त्याने नमुन्याची बॉटल प्रयोगशाळेत पोहचवली. त्याने उलटतपासामध्ये घटनास्थळावरील ढाबा कोणाच्या मालकीचा आहे याबाबत कागदपत्रे प्राप्त केलेली नसल्याचे सांगितलेले आहे.

**०५.** वर नमुद पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादीच्या पुराव्यावरुन घटनास्थळावरील ढाब्यामध्ये बसून आरोपी क्रं. २ व ३ हे द्रवपदार्थाचे सेवन करत होते ही बाब सिध्द होते. आरोपी क्रं. २ व ३ यांनी ते त्या ढाब्यामध्ये बसून दारुचे सेवन करत होते ही बाब कबुल केलेली आहे. त्यामुळे त्यांना सिध्द दोषी ठरविण्यात आलेले आहे. अभियोग पक्षाच्या कथेनुसार आरोपी क्रं. १ हा त्या ढाब्याचा मालक आहे व त्याने आरोपी क्रं. २ व ३ यांना त्या ठिकाणी बसून दारु पिण्याची व्यवस्था केली होती. परंतु, आरोपी क्रं. १ वरील दोषारोप सिध्द होण्यासाठी प्रथमतः घटनास्थळावरील ढाब्याचा मालक अथवा चालक किंवा त्याच्याशी संबंधित असल्याचे निसंशयीःतपणे सिध्द होणे गरजेचे आहे.

०६. त्या अनुषंगाने फिर्यादीला उलटतपासामध्ये प्रश्न विचारण्यात आलेले आहेत. त्यामध्ये त्याने घटनास्थावरील ढाबा आरोपीच्या मालकीचा असल्याबाबतची कागदपत्रे प्राप्त केलेली नसल्याचे सांगितलेले आहे. तो ढाबा आरोपीच्या मालकीचा अथवा ताब्यातील अथवा त्याच्याशी संबंधित असल्याचे दाखविण्यासाठी अभियोग पक्षातर्फे कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. अशा परिस्थीतीत घटनास्थळावरील ढाबा आरोपीच्या मालकीचा, त्याच्याशी संबंधीत अथवा त्याच्या ताब्यातील असल्याची बाब कोणत्याही विश्वासार्ह पुराव्याने सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपी घटनास्थळावरील ढाब्यावर दारुचा सार्वजनिक गुत्ता चालवित होता असे म्हणता येणार नाही.

०७. फौजदारी कायद्यातील तत्वानुसार आरोपीवरील दोषारोप वाजवी शंकेपलिकडे जावून सिध्द होणे गरजेचे आहे. परंतु सदर खटल्यामध्ये आरोपीवरील दोषारोप वाजवी शंकेपलीकडे जावून सिध्द झालेले नाहीत. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष ''नकारार्थी'' नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.२ करीताः–</u>

०८. उपरोक्त मुद्दा क्र.१ च्या कारणमिमांसेत नमूद केल्याप्रमाणे आरोपीविरुद्ध गुन्हा शाबीत करण्यास अभियोगपक्षास अपयश आल्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे:–

:–<u>आदेश</u>–:

| | |
|---|---|
| ०१) | आरोपी नामे **दिपक धर्माजी कयापाक** याला महाराष्ट्र मद्यनिषेध कायदा १९४९ चे कलम ६८(अ)(ब) अंतर्गत शिक्षेसपात्र पात्र असणा–या गुन्हयांच्या अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| ०२) | आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ०३) | गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल अपील कालावधी समाप्तीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाटीसाठी राज्य उत्पादन शुल्क, नांदेड यांच्याकडे पाठविण्यात यावा. |
| ०४) | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये रक्कम रुपये १५,०००/–चे वैयक्तीक बंधपत्र व त्याच रक्कमेचा जातमुचलका सादर करावा. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

PRADIP MADAN MANE
Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2026.04.10 17:50:45 +0530

दिनांकः १०/०४/२०२६ **(पी. एम. माने)**

किनवट प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.१,किनवट

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Jr. Clerk | : | Shri. S. V. Chatlewar |
| Court Name | : | Court of J.M.F.C.,Kinwat. |
| Date | : | 10.04.2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 10.04.2026 |
| Judgment uploaded on | : | 10.04.2026 |

x x x x